पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ४
सभावृत्तांत

दिनांक - ७/०७/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०७/०७/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **“संत ज्ञानेश्वर महाराज”** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे – सभापती**
२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३. मा.सुपे आशा रविंद्र
४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.जालिंदर (बाप्पु)शिंदे,
७. मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे
८. मा.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य
९. मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.थोरात– कार्य अभियंता, (विद्युत)), मा.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत) मा.जयंत बरशेट्टी कार्य. अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.कोंडे के.बी. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.संजय घुबे - उप अभियंता, मा.वाघमारे एस.बी.- उप- अभियंता (स्थापत्य), मा.लांडे बी.पी –उपअभियंता (विद्युत) मा.मनोज सेठीया – उपअभियंता (जनि), मा.अर्चना अत्तरदे क.अभियंता, मा.धडस ए.आर.- क.अभियंता (जनि), मा.व्ही.एस. राऊत- क.अभियंता (पापू), मा.बगली एस.ए. - क.अभियंता (पापू), मा.दिग्विजय पवार - क.अभियंता (पापू), मा. श्री. इप्पकायल एस. एच. लेखाधिकारी, मा.दाते टी.एच. – सहा. आरोग्य अधिकारी, मा.एस.व्ही.बगाडे (सहा.उद्यानअधिक्षक),मा.देशमाने पी.एच.-कार्या.अधिक्षक, मा.नाडेकर बी.के.सहा. शिक्षक, मा.श्री.फुगे एन.जे.- क्रीडा पर्यवेक्षक,

-----

**मा.सभापती**- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

**विषय क्रमांक १.** प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मधील जय महाराष्ट्र चौक येथील कमानीस **"छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार "** असे नामकरण करणेबाबत.
मा.जालिंदर शिंदे, मा.अनुराधा गोफणे यांचे दि. ७/७/२०१६ चे पत्र.

अ) दिनांक १/६/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- १० विषय क्रमांक- १

दिनांक- ७/७/२०१६

सूचक- मा.जालिंदर शिंदे अनुमोदक- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ – मा.जालिंदर शिंदे, मा.अनुराधा गोफणे यांचे दि. ७/७/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मधील जय महाराष्ट्र चौक येथील अस्तित्वातील जुनी कमान जीर्ण व कमकुवत झाल्याने त्या ठिकाणी जुन्या कमानीचे नुतनीकरण करणेत आले आहे. तसेच सदरच्या कमानीचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदर कमानीस **"छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार "** असे नामकरण केल्यास परिसराची शोभा वाढणार आहे. तरी प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मधील जय महाराष्ट्र चौक येथील कमानीस **"छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार "** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदरची पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

सही/-
डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे
सभापती
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/४७८/२०१६
दिनांक- २८/०७/२०१६

**सही / -**
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय,
भोसरी – ३९

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.७/७/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.वसंतराव (नाना) लोंढे –** दाते साहेब सहा.आरोग्य अधिकारी यांना दोन तास फोन करीत होतो परंतू त्यांनी फोन घेतला नाही. आयुक्त साहेबांना फोन केला होता परंतु ते परदेशात असल्यामुळे त्यांचा फोन लागत नव्हता. आयुक्त साहेब सुध्दा लगेच फोन घेतात. सगळे अधिकारी रिसपेक्ट देतात. परंतू दाते साहेब का असे वागतात. नगरसेवकांचा अवमान केला म्हणून त्यांना नोटीस दया. काही तरी Action घ्या. दोन तास वाट पाहिल्यावर सुध्दा फोन केला नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** या ठिकाणी अधिका-यांना सूचना देण्यात येते की, ज्या काही अडचणी आहेत त्या संदर्भात त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. महापालिकेने आपल्याला फोन दिलेले आहेत. फोन न उचलणे हे चुकीचे आहे. फोन करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मा.वसंतराव (नाना) लोंढे –** आमचे वॉर्डमधील कचरा उचलला नाही. कच-याचा वास सुटला आहे.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** नानांच्या वॉर्डमधील कामे करुन द्यावीत.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे प्रभागात किती दिवस झाले आरोग्याचे कर्मचारी येतच नाही.

**मा.वसंतराव (नाना) लोंढे –** नाले सफाईचे कामाची काय परिस्थिती आहे? शांतीनगर झोपडपट्टीचा खालचा भाग साफ केलेला नाही. अतिशय घाण झालेली आहे.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमधील नाला सफाई करण्यात यावी. काम करण्यासाठी जे कर्मचारी येतात ते खूपच वयस्कर आहेत ते सफाईचे काम करु शकत नाही.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** तीन, चार महिने पावसाळा आहे. सर्व वॉर्डमधील साफसफाईची कामे झाली पाहिजे. ड्रेनेज साफ केले पाहिजे. सर्वांचे फोन नीट घेत जा.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** एकूण ८० कामे आहेत. ६५ कामे पब्लिश होणार आहे. २२९ कामे पुर्ण केलेली आहे. १० कामे राहिली आहे. त्या कामाचे इस्टीमेंट होत नाही.

**मा.चंद्रकांत वाळके –** ३ मे पासून दिवसाआड पाणी झालेले आहे. या कालावधीमध्ये टँकरची मागणी केली असता टँकर उपलब्ध केले त्याबद्दल तीनही अधिका-यांचे अभिनंदन करतो.

१५ वर्षापासून पाणीपुरवठा होत आहे. सातत्याने पाणी पुरवठा होत असला तरी त्या भागात पाणी व्यवस्थित जात नाही. कदाचित पाईप लाईन चोकअप झाली असेल. विजयनगर ९ नंबर सतत डिस्ट्रब असते. तेथे कोणत्याही प्रकारची सुविधा केलेली नाही. मला असे वाटते की, सातत्याने पाणीपुरवठा कमी होत असल्यामुळे तेथील चोकअप पाहणे गरजेचे आहे. कमी दाबाने पाणी येत असल्यामुळे तेथील पाण्याचे पाईप लाईन बदलणे. भिमाशंकर सोसायटी येथे पाणी येत नव्हते. तेथील चोकअप काढले असते तर व तिथे १०० मीटर अंतरावर पाईप लाईन टाकली असती तर पाणीपुरवठा झाला असता. दिघी भागामध्ये अजून लोकसंख्या वाढणार आहे. त्यामुळे ४ इंची पाईप लाईन टाकुन दया. नक्की काय प्रोब्लेम आहे ते पाहणे.

आम्ही संबंधीत नगरसेवक नेहमी सांगत असतो की, आमचे प्रभागात मेन रस्ता आहे तेथे मोठमोठे खड्डे झालेले आहेत त्या रस्त्याचे काम करणे. विद्युतचे संबंधीत अधिकारी यांना सांगत असतो. मॅग्झीन पासून सर्व लाईट चालू करणे.

परंतू आजकाल लोक पेपरला बातमी देतात. व्हॉट्स अप वर बातमी देतात. आम्ही सांगायचे अगोदर जे लोक सांगतात त्यासाठी काही तरी केले पाहिजे.

**मा.आशा सुपे -** आमचे येथे रस्त्यावर रोज पाण्याची गळती होते. तिथे चोकअप आहे. ते काम पुर्ण करण्यात यावे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** ८४ कामापैकी ६ कामे जुनी आहेत. ७८ कामाचे सबमिशन होईल. ५ कोटी ९० लाखाची कामे आहेत. ३५ कामांची मुदतवाढ केली आहे. ६५ कामे कॉन्ट्रॅक्टर निविदा प्रसिध्द केली आहे. सध्या १० कामांची टेंडर लिस्ट काढली आहे.

**मा.वसंतराव (नाना) लोंढे -** १५ जुलैपर्यंत सर्व टेंडर प्रक्रिया झाली पाहिजे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) -** ७८ कामापैकी ३५ कामांची मुदतवाढ केली आहे.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमध्ये सगळया रस्त्यावर पाणी येत आहे. जुन्या ड्रेनेज लाईन आहेत त्या बुजवून टाकल्या पाहिजे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** हिन्दी स्कुल आहे त्या ठिकाणचे रस्त्याचे सगळे पाणी जाते. तेथील ड्रेनेज लाईन चोकअप झाली असेल. लाईट गेली की सर्व बंद होते.

**मा.अनुराधा गोफणे-** पहिल्या लिस्टमध्ये सगळया प्रभागाची कामे काढली आहेत. सेकंड लिस्टमध्ये कुठली कामे आहेत.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** २५ लाखाची कामे आपण ओपन केली आहे.

**मा.अनुराधा गोफणे –** सेकंड लिस्टचे कामाचे इस्टीमेट तयार करणे. सगळया कामाची वर्कऑर्डर झाली पाहिजे.

**मा.मनोज सेठिया (उपअभियंता जलनि:सारण)** – ड्रेनेजची २५ कामे राहिली आहेत. २२ कामांची निविदा प्रसिध्द झाली आहे. ७ कामाचे टेंडर झालेले आहे. बाकीची कामे १५ दिवसात होईल.

**मा.लांडे (उपअभियंता,विद्युत)** - ४४ कामाची निविदा प्रसिध्द केली आहे. ५१ कामे प्रसिध्दीला दिली आहेत. २५ लाखाची ६ कामे आहेत. ती कामे पुढील हस्त्यात होतील.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा)** - प्रभागातील २२ कामांची निविदा प्रसिध्द झालेली आहे. आता धरण २६ टक्के भरलेले आहे. मागचे वर्षी ३९ टक्के होते. त्यामुळे आता आपण पाणी २४ टक्के कपात केलेले आहे.

**मा.आशा सुपे** – आमचे वॉर्डमधील पाणी वापरासाठीच्या मोटर्स जप्त केल्या आहेत त्या देऊन टाका.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** जप्त केलेल्या पाण्याच्या मोटर्स देऊन टाका.

**मा.जयंत बरशेट्टी (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा) –** ३३ मोटर्स जप्त केल्या आहेत. त्यावर प्रस्ताव ठेवण्यात येईल व त्यानंतर जो निर्णय होईल ती कार्यवाही करण्यात येईल.

**मा.संजय आहेर (स्विकृत सदस्य)** – इंद्रायणीनगर येथील अनाधिकृत फ्लेक्स बाबत काहीही कार्यवाही केली नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – स्पेसिफिक सांगितले होते त्यामुळे एकाच ठिकाणचे फ्लेक्स काढता येत नाही. अनाधिकृत बांधकाम विभागाला आपल्या सूचना देता येतील. ठिक आहे इथून पुढे नियमाधीन कारवाई करण्यात येईल. रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीबाबत त्वरीत कार्यवाही सुरु करायची आहे. प्रभागांतर्गत कामाचे आदेश काढून कामकाज सुरु करायचे आहे.

**मा.वसंतराव (नाना) लोंढे –** महापालिकेने अंडरग्राऊंड केबल केलेली आहे. एमइसीबीने काही काम केले नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** विद्युतचे ज्या ज्या ठिकाणी एमइसीबीचे बॉक्स पडून आहे त्यासाठी एमइसीबीला कॉन्टॅक्ट करुन विद्युत विभागाने कार्यवाही करावी.

**मा.वसंतराव (नाना) लोंढे –** पाणी पुरवठा बाबत कमतरता करावी. आरोग्य विभागाने कचरा उचलणे, औषध फवारणी करणे, धूर फवारणी करणे, ज्या ठिकाणी पाण्याचे डबके आहे त्यावर उपाययोजना करणे. ड्रेनेज चोकअप त्वरीत काढणेची व्यवस्था करणे, गटारे चोकअप काढणेचे कामकाज करावे. व नागरिकांना सहकार्य करावे.

**मा.लांडे (उपअभियंता,विद्युत) -** एलइडी बाबत विद्युत विभागाकडून जी तरतूद केली आहे त्याप्रमाणे दिले आहे. आता सर्व नवीन एलइडी आणणार आहे.

**मा.जालिंदर शिंदे –** फ्लेक्स बाबत वारंवार सांगितले आहे. पुलाखाली तर सगळीकडे फ्लेक्स लावलेले असतात. त्यांचेवर फौजदारी दाखल करणे. बसस्टॉपचे फोटो घ्या. सगळया सदस्यांचा कॉन्टॅक्ट नं. असतो.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** आरोग्य विभागाचे नाला साफ करण्याचे काम चालू आहे. अतिक्रमण विभागाला कामाबाबत सूचना देतो.

**मा.जालिंदर शिंदे –** अतिक्रमण केलेतर त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** मशिनबाबत पात्र झालेल्या नागरिकांना मशिन कधी मिळणार आहे? सायकल वाटप कधी होणार आहे? नागरिक घरी येतात.

**श्रीमती जयश्री पवळे (समूह संघटक) -** मशिनची खरेदी नसल्यामुळे मशिन वाटप बंद आहे. सायकल वाटपची पाचवी यादी सुरु आहे.

**मा.सुरेखा गव्हाणे –** मशिन व सायकलच्या पात्र व अपात्र याद्या दयाव्यात.

**श्रीमती जयश्री पवळे (समूह संघटक) -** सर्व योजनांच्या पात्र व अपात्र याद्या सन्मा. नगरसदस्यांच्या वैयक्तिक इमेल आयडीवर पाठविण्यात येते.

**मा.अनुराधा गोफणे –** आमचे येथे ड्रेनेज चोकअपचा प्रोब्लेम आहे. जी मुले कामे करतात ती कामे व्यवस्थित करीत नाहीत. पावसाळयाचे दिवस असल्यामुळे ड्रेनेजच्या तक्रारी जास्त येतात. कामगारांची संख्या थोडी वाढवली पाहिजे. चोकअप काढायला छोटया गाडया येतात.

**मा.दाते टी.एच.(सहा.आरोग्याधिकारी)-** प्रत्येक प्रभागामध्ये गाडी येत असते. आरोग्य विभागाकडे ६ मशिन्स आणि २ गाडया आहेत. पालखीच्या दिवसात सर्व कामे व्यवस्थित करुन देण्यात येईल.

**मा.चंद्रकांत वाळके –** ५ गाडया असतील तर दिवसाआड औषध फवारणीची काम व्यवस्थित करता येईल.

**मा.अनुराधा गोफणे –** स्थापत्य उद्यानचे कर्मचारी काहीच कामे करीत नाही. सखुबाई गवळी उद्यानमधील एका हॉलमध्ये सगळया लाईट निघाल्या आहे. एकदा पाहणी करुन करण्यात यावी.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** पुढच्या मिटींगला सर्व अधिका-यांना बोलवून घेण्यात येईल.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती)-** पुढच्या मिटींगला सर्व अधिकारी असतील तरच मिटींग घेण्यात येईल.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.